# पुणे महानगरपालिका
# महिला व बाल कल्याण समिती
## कार्यपत्रिका क्र. १३

**महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक १२/९/२०१८ रोजी दुपारी ३=३०(साडे तीन ) वाजता महात्मा ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.**

**सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.**

**विषय क्र. ६८**

**मा.सौ. मंजुश्री खर्डेकर यांचे दि.२३.८.२०१८ चे पत्र .**

प्रभाग क्र.१३ हॅपी कॉलनी एरंडवणे येथे मृत्युंजय मंदिराजवळ फुटपाथवर फक्त महिलांसाठी स्वच्छतागृह आहे. तिथे जवळपास पुरुषांसाठी स्वच्छतागृह नाही . त्यामुळे महिला स्वच्छतागृहाच्या आसपास आणि मागील बाजूस पुरुष विधी उरकतात. त्यामुळे त्या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरते. हा मुख्य रहदारीचा रस्ता आहे व जवळच मंदिर पण आहे.तरी ह्या ठिकाणी महिला स्वच्छतागृहा शेजारीच पुरुषांसाठी स्वच्छतागृह उभारण्यात यावे .

**विषय क्र. ६९**

**मा.सौ. लता धायरकर यांचे दि.२४.८.२०१८ चे पत्र .**

पुणे पेठ घोरपडीगांव स.नं.५०/२अ ( पार्ट ) या मिळकतीवरील व्हेजिटेबल मार्केटने अंशत: आरक्षित ( एकूण क्षेत्र १३२५.०० चौ.मी. ) असणाऱ्या जागेत भाजी मार्केट बांधण्यात यावे. सदर मार्केटची जागा विकसकाला बांधणेसाठी न देता पुणे महानगरपालिकेने संपूर्ण जागोवर ( एकूण क्षेत्र १३२५.०० चौ.मी. ) भाजी मार्केट बांधण्यात_यावे .

**विषय क्र. ७०**

**मा.अमोल बालवडकर ,मा.सौ. स्वप्नाली सायकर व मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २७.८.२०१८ चे पत्र**

प्रभाग क्र. ९ बाणेर मध्ये पुणे मनपाच्या मालकीची ११००० चौ.मी.ॲमिनिटी स्पेस आहे. सदर जागेवर सी–२ चे आरक्षण आहे. सदर आरक्षित जागेवर बालेवाडी स.नं.२१ येथील विकसकाने ३००० चौ.मी. आरक्षण विकसित( बांधकाम करुन देणे) करून देणे अपेक्षित आहे. सदर ११००० चौ.मी.जागेच्या आरक्षणापैकी काही आरक्षण दिव्यांगासाठी सुध्दा राखीव आहे.

तरी पुणे पश्चिम भागातील गोरगरीब नागरिकांना आरोग्य सेवा घेण्यासाठी ससून हॉस्पिटल किंवा कमला नेहरु हॉस्पिटल याठिकाणी यावे लागते. यासाठी लागणारा वेळ व त्रास कमी होण्याच्या दृष्टीने शहराच्या पश्चिम भागात महानगरपालिकेचे सुसज्ज असे मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल असणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेवून याभागात नवीन हॉस्पिटल उभारण्यासाठी सन २०१७ – १८ च्या अंदाजपत्रकात महत्वकांक्षी योजना म्हणून रु.५ कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. तरी सदर आरक्षित जागेवर पुणे मनपाचे हॉस्पिटल लवकरात लवकर विकसित करण्यात यावे तसेच यासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पाचा देखील सहभाग घ्यावा .

**विषय क्र. ७१**

**मा. सौ.श्वेता चव्हाण व मा.फरजाना शेख यांचे दि. २९ .८.२०१८ चे पत्र .**

पांडु लमानवस्ती येरवडा ,मधील गांगुली मंगलकार्यालय येथिल शौचालय जुने व मोडकळीस आले आहे. तसेच वेळोवेळी त्या शौचालयाचे देखभाल दुरुस्ती होत नाही. त्यामुळे दुर्गंधी पसरलेली आहे. घरोघरी शौचालय असल्यामुळे सदर शौचालयाचा वापर कमी प्रमाणात नागरिकांकडून होत नाही. त्यामुळे सदर शौचालय पाडून नविन कमी सीस्टस चे शौचालय बांधण्यात यावे तसेच उरलेल्या जागेवर प्रभागातील गरजु विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय व अभ्यासिका बांधण्यात यावे.

**विषय क्र. ७२**

**मा. सौ.श्वेता चव्हाण व मा.फरजाना शेख यांचे दि. २९ .८.२०१८ चे पत्र .**

पांडु लमानवस्ती पायथ्या लगत येरवडा येथे पुरुष मुतारी बांधलेली आहे. सदर मुतारीची परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच त्या ठिक़ाणी काही अंतरावर दुसरी पुरुष मुतारी असल्यामुळे सदर मुतारीचा नागरिकांकडून वापर होत नसुन दुर्गंधी पसरलेली मुतारी पाडण्यात यावी.

**विषय क्र. ७३**

**मा.संजय भोसले,गटनेते,शिवसेना व मा.विशाल धनवडे यांचे दि. ४.९.२०१८ चे पत्र .**

पुणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेवकांना सध्या अशंदायी वैद्यकिय सहाय्य योजनेचा लाभ मिळत असून त्यामध्ये फक्त माजी नगरसेवक व त्यांच्या पत्नीस या योजनेचा लाभ मिळत आहे. यापुढे माजी नगरसेवकांचे आई–वडील व मुलांना याचा लाभ देऊन सेमी प्रायव्हेट वॉर्डची सुविधा देण्यात यावी.

**विषय क्र. ७४**

**मा.सौ.अर्चना मुसळे व मा.सौ.अर्चना पाटील यांचे दि. ६.९.२०१८ चे पत्र .**

प्रभाग क्र.८ मध्ये औंध येथे स्मार्ट सिटी कॉर्पोरेशन कडून रामचंद्र गायकवाड (डी.पी.रोड) रस्ता विकसित करण्यात येत असून सदर रस्त्यावर डी.ए.व्ही.स्कूलच्या बाजूस भिंतीला असणारी मुतारी कुजून खराब झाली आहे. त्यामुळे शाळेशेजारी व रस्त्यावर प्रचंड दुर्गंधी व घाण दररोज पसरत आहे.या ठिकाणी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्मार्ट टॉयलेट बांधण्यात येणार आहे. तरी सदर मुतारी पाडून टाकण्यात यावी.

**विषय क्र. ७५**

प्रभाग क्र. ०९ बाणेर सर्वे नं. १६४/१+२+४+५+६ अ येथील बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्राचा वापर या भागातील स्थानिक डॉक्टरांच्या संघटनेला या भागातील गोर गरीब जनतेच्या वैद्यकीय उपचारासाठी व सेवेसाठी उपलब्ध करुन देणेबाबत मा. अमोल बालवडकर व मा. बाबुराव चांदेरे ,मा.सौ. ज्योती गणेश कळमकर व मा.सौ. स्वप्नाली प्रल्हाद सायकर यांचे दिनांक १०.५.२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.२१, दि.२३.५.२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/एचओ/४४५,दि.१.९.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय .

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**विषय क्र. ६८**

**मा.सौ. मंजुश्री खर्डेकर यांचे दि.२३.८.२०१८ चे पत्र .**

प्रभाग क्र.१३ हॅपी कॉलनी एरंडवणे येथे मृत्युंजय मंदिराजवळ फुटपाथवर फक्त महिलांसाठी स्वच्छतागृह आहे. तिथे जवळपास पुरुषांसाठी स्वच्छतागृह नाही . त्यामुळे महिला स्वच्छतागृहाच्या आसपास आणि मागील बाजूस पुरुष विधी उरकतात. त्यामुळे त्या परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरते. हा मुख्य रहदारीचा रस्ता आहे व जवळच मंदिर पण आहे.तरी ह्या ठिकाणी महिला स्वच्छतागृहा शेजारीच पुरुषांसाठी स्वच्छतागृह उभारण्यात यावे .

**विषय क्र. ६९**

**मा.सौ. लता धायरकर यांचे दि.२४.८.२०१८ चे पत्र .**

पुणे पेठ घोरपडीगांव स.नं.५०/२अ ( पार्ट ) या मिळकतीवरील व्हेजिटेबल मार्केटने अंशत: आरक्षित ( एकूण क्षेत्र १३२५.०० चौ.मी. ) असणाऱ्या जागेत भाजी मार्केट बांधण्यात यावे. सदर मार्केटची जागा विकसकाला बांधणेसाठी न देता पुणे महानगरपालिकेने संपूर्ण जागोवर ( एकूण क्षेत्र १३२५.०० चौ.मी. ) भाजी मार्केट बांधण्यात_यावे .

**विषय क्र. ७०**

**मा.अमोल बालवडकर ,मा.सौ. स्वप्नाली सायकर व मा.सौ.ज्योती कळमकर यांचे दि. २७.८.२०१८ चे पत्र**

प्रभाग क्र. ९ बाणेर मध्ये पुणे मनपाच्या मालकीची ११००० चौ.मी.ॲमिनिटी स्पेस आहे. सदर जागेवर सी–२ चे आरक्षण आहे. सदर आरक्षित जागेवर बालेवाडी स.नं.२१ येथील विकसकाने ३००० चौ.मी. आरक्षण विकसित( बांधकाम करुन देणे) करून देणे अपेक्षित आहे. सदर ११००० चौ.मी.जागेच्या आरक्षणापैकी काही आरक्षण दिव्यांगासाठी सुध्दा राखीव आहे.

तरी पुणे पश्चिम भागातील गोरगरीब नागरिकांना आरोग्य सेवा घेण्यासाठी ससून हॉस्पिटल किंवा कमला नेहरु हॉस्पिटल याठिकाणी यावे लागते. यासाठी लागणारा वेळ व त्रास कमी होण्याच्या दृष्टीने शहराच्या पश्चिम भागात महानगरपालिकेचे सुसज्ज असे मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटल असणे अत्यंत आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेवून याभागात नवीन हॉस्पिटल उभारण्यासाठी सन २०१७ – १८ च्या अंदाजपत्रकात महत्वकांक्षी योजना म्हणून रु.५ कोटीची तरतूद करण्यात आलेली होती. तरी सदर आरक्षित जागेवर पुणे मनपाचे हॉस्पिटल लवकरात लवकर विकसित करण्यात यावे तसेच यासाठी स्मार्ट सिटी प्रकल्पाचा देखील सहभाग घ्यावा .

**विषय क्र. ७१**

**मा. सौ.श्वेता चव्हाण व मा.फरजाना शेख यांचे दि. २९ .८.२०१८ चे पत्र .**

पांडु लमानवस्ती येरवडा ,मधील गांगुली मंगलकार्यालय येथिल शौचालय जुने व मोडकळीस आले आहे. तसेच वेळोवेळी त्या शौचालयाचे देखभाल दुरुस्ती होत नाही. त्यामुळे दुर्गंधी पसरलेली आहे. घरोघरी शौचालय असल्यामुळे सदर शौचालयाचा वापर कमी प्रमाणात नागरिकांकडून होत नाही. त्यामुळे सदर शौचालय पाडून नविन कमी सीस्टस चे शौचालय बांधण्यात यावे तसेच उरलेल्या जागेवर प्रभागातील गरजु विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय व अभ्यासिका बांधण्यात यावे.

**<u>विषय क्र. ७२</u>**

**<u>मा. सौ.श्वेता चव्हाण व मा.फरजाना शेख  यांचे दि.  २९ .८.२०१८ चे पत्र .</u>**

पांडु लमानवस्ती पायथ्या लगत येरवडा येथे पुरुष मुतारी बांधलेली आहे. सदर मुतारीची परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. व नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच त्या ठिक़ाणी काही अंतरावर दुसरी पुरुष मुतारी असल्यामुळे सदर मुतारीचा नागरिकांकडून वापर होत नसुन दुर्गंधी पसरलेली मुतारी पाडण्यात यावी.

**<u>विषय क्र. ७३</u>**

**<u>मा.संजय भोसले,गटनेते,शिवसेना व मा.विशाल धनवडे  यांचे दि.  ४.९.२०१८ चे पत्र .</u>**

पुणे महानगरपालिकेच्या माजी नगरसेवकांना सध्या अशंदायी वैद्यकिय सहाय्य योजनेचा लाभ मिळत असून त्यामध्ये फक्त माजी नगरसेवक व त्यांच्या पत्नीस या योजनेचा लाभ मिळत आहे. यापुढे माजी नगरसेवकांचे आई–वडील व मुलांना याचा लाभ देऊन सेमी प्रायव्हेट वॉर्डची सुविधा देण्यात यावी.

**<u>विषय क्र. ७४</u>**

**<u>मा.सौ.अर्चना मुसळे व मा.सौ.अर्चना पाटील  यांचे दि.  ६.९.२०१८ चे पत्र .</u>**

प्रभाग क्र.८ मध्ये औंध येथे स्मार्ट सिटी कॉर्पोरेशन कडून रामचंद्र गायकवाड (डी.पी.रोड) रस्ता विकसित करण्यात येत असून सदर  रस्त्यावर डी.ए.व्ही.स्कूलच्या बाजूस भिंतीला असणारी मुतारी कुजून खराब झाली आहे. त्यामुळे शाळेशेजारी व रस्त्यावर प्रचंड दुर्गंधी व घाण दररोज पसरत आहे.या ठिकाणी स्मार्ट सिटीच्या माध्यमातून स्मार्ट टॉयलेट बांधण्यात येणार आहे. तरी सदर मुतारी पाडून टाकण्यात यावी.

**<u>विषय क्र. ७५</u>**

प्रभाग क्र. ०९ बाणेर सर्वे नं. १६४/१+२+४+५+६ अ येथील बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्राचा वापर या भागातील स्थानिक डॉक्टरांच्या संघटनेला या भागातील गोर  गरीब जनतेच्या वैद्यकीय उपचारासाठी व सेवेसाठी उपलब्ध करुन देणेबाबत मा. अमोल  बालवडकर व मा. बाबुराव चांदेरे ,मा.सौ. ज्योती गणेश कळमकर व  मा.सौ. स्वप्नाली प्रल्हाद सायकर यांचे दिनांक १०.५.२०१८ चे पत्रावर झालेला महिला व बाल  कल्याण समिती ठराव क्र.२१, दि.२३.५.२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/एचओ/४४५,दि.१.९.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय .